-: प्रेस नोट :- दिनांक २८/०७/२०२६

**शस्त्राचा धाकाने जिवे ठार मारण्याची धमकी देवुन रू. २५ लाख खंडणी वसुल करणारा कुख्यात गुंड झुल्फीकार बेहलीम, त्याचा गुंड भाऊ मोहसीन बेहलीम यांच्यासह टोळीच्या एकुण १२ सराईत गुन्हेगारांना गुन्हे शाखा, मुंबई यांनी अटक केल्याबाबत**

मागील काही दिवसापासून मुंबईस्थित बांधकाम व्यवसायिकास कुख्यात गुंड झुल्फीकार बेहलीम, त्याचा गुंड भाऊ मोहसीन बेहलीम यांनी, त्यांच्या गुन्हेगारी हस्तकांमार्फत, कंत्राटी काम सुरू करण्याकरिता रू. २५ लाख रकमेच्या खंडणीची मागणी केली होती. सदर मागणी पुर्ण न केल्यास शस्त्राचा धाक दाखवुन जीवे ठार मारण्याची धमकीही सदर गुन्हेगारी टोळीने या बांधकाम व्यवसायिकास दिली होती. प्राप्त माहितीची शहानिशा केल्यावर कक्ष ९, गुन्हे शाखा, मुंबई या कार्यालयाच्या पथकाने बांद्रा परिसरात दिनांक २७/०७/२०२६ रोजी सापळा रचला होता. सापळा कारवाईमध्ये कुख्यात गुंड झुल्फीकार बेहलीम, त्याचा गुंड भाऊ मोहसीन बेहलीम व त्यांचे इतर १० गुंड साथीदार, अशा एकुण १२ सराईत गुंडाना, खंडणीची रक्कम स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. या प्रकारे टोळीच्या म्होरक्यासह अद्यापपर्यंत एकुण १२ सक्रिय गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे.

वर नमुद १२ आरोपींविरोधात गुप्रशा., गुन्हा नोंद क्र. ९२/२०२६(बांद्रा पोलीस ठाणे गुरक्र १५५५/२६) कलम ३०८ (५), ३५१(३), ६१(२),३(५) सह कलम ३,२५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन मा. वरिष्ठांच्या आदेशान्वये सदर गुन्हा पुढील तपासाकरीता कक्ष-९, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई येथे वर्ग करण्यात आला. नमुद अटक आरोपींना रिमांडकरिता विहत वेळेत मा. न्यायालयासमक्ष हजर केले असता त्यांना दिनांक ३१/०७/२०२६ पर्यंत पोलीस कोठडी मंजुर करण्यात आलेली आहे.

सदर गुन्हयातील सर्व आरोपी सराईत गुंडप्रवृत्तीचे गुन्हेगार आहेत. मोक्का कायद्यातंर्गत यापुर्वी अटक असलेला व सध्या जामिनावर मुक्त असलेला प्रख्यात गुंड झुल्फीकार बेहलीम नमुद गुन्हयातील म्होरक्या व त्याचा भाऊ मोहसीन बेहलीम व इतर १० सक्रीय गुन्हेगार यांनी सदरचा गुन्हा केलेला आहे. सदर गुंड टोळीने मुंबई व आजुबाजुच्या परिसरातील अनेक व्यावसायिकांना असेच धमकी देवून, दहशत पसरवून खंडणी उकळल्याबाबत प्राथमिक माहिती प्राप्त होत आहे.

**याद्वारे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, वर नमुद टोळीने कोणाकडे खंडणीची मागणी केली असेल किंवा यापुर्वी कोणाकडून खंडणी वसूल केली असेल, तर त्यांनी कक्ष ९, गुन्हे शाखा, मुंबई/मुंबई पोलीसांना त्वरित संपर्क साधावा.**

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलस आयुक्त श्री. कृष्णकांत उपाध्याय, पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-०१) श्री. नवनाथ ढवळे, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. विनायक चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष ९ चे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. सचिन पुराणिक, सपोनि श्री. महेंद्र पाटील, सपोनि श्री. जयदिप जाधव, सपोनि श्री. मोहन जगदाळे, सपोनि श्री. विजय धोत्रे, सपोनि श्री. श्रीराम घोडके, पोउनि कल्याण पाटील, पोउपनि ऋशिकेष बाबर, पोउपनि सुजित म्हैसधुणे, सफौ शिंदे, सफौ म्हाळसंक, सफौ भोसले, सफौ वैद्य, सफौ गवळी, पोह परब,

पोह राहुल पवार, पोह भिंगारदेवे, पोशि पाटील, पोशि सोनवणे, पोशि कदम, पोशि बच्छाव, मपोह गडहिरे यांनी केली आहे.